# धुळ्यात विश्रामगृहात कोट्यवधींची रोकड

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील गुलमोहर शासकीय विश्रामगृहात तब्बल एक कोटी ८४ लाख ८४ हजार रुपयांची रोकड सापडल्याने खळबळ उडाली आहे. ही रक्कम धुळे दौऱ्यावर आलेल्या विधी मंडळाच्या समितीसाठी गोळा करण्यात आल्याचा आरोप शिवसेना (उबाठा) गटाचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार अनिल गोटे यांनी केला आहे. त्यांनी समितीचे अध्यक्ष व दौऱ्यावरील सर्व आमदारांवर गुन्हा दाखल करावा तसेच या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्वतंत्र समिती नेमून एक महिन्यात अहवाल मागवावा, अशी मागणी केली आहे.

काल संध्याकाळी ६ वाजल्यापासून ते आज पहाटे ४ वाजेपर्यंत, जवळपास दहा तास, गोटे समर्थक शासकीय विश्रामगृहात ठाण मांडून बसले होते.

पत्रपरिषदेत गोटे म्हणाले की, इतिहासात प्रथमच शासकीय विश्रामगृहात इतकी मोठी रक्कम सापडली आहे. यामागे कोणाचा हात आहे, हे स्पष्ट व्हायला हवं. त्यांनी सांगितले की, याबाबत पोलिस अधीक्षकांना माहिती दिल्यावर त्यांनी १० मिनिटांत येतो असं सांगितलं, पण ते २० तास उलटून गेले तरी पोहोचलेच नाहीत.

गोटे यांनी यासंदर्भात जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, गृहसचिव तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना थेट फोन केल्याचे सांगितले. आठ वर्षांत पहिल्यांदाच मुख्यमंत्र्यांना फोन केला, पण त्यांनी तो उचललाच नाही. त्यांच्या सचिवाने फोन घेतला आणि १० मिनिटांत फोन लावतो असं सांगितलं, पण आतापर्यंत फोन आलेला नाही, असे गोटे म्हणाले.

माझा पोलिस, सीआयडी, अँटी करप्शन यंत्रणांवर विश्वास नाही. तुकाराम मुंडे किंवा प्रविण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांची समिती नेमावी. अर्जुन खोतकरच मुख्य संशयित असतील, तर त्यांनीच चौकशीची मागणी करावी एवढी हिंमत दाखवावी, असं खुले आव्हान गोटेंनी दिलं.

त्यांनी असा दावाही केला की, १०२ क्रमांकाच्या खोलीत पाच कोटी रुपये होते, पण काही रक्कम लंपास झाली. त्यामुळे सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी त्यांनी केली आहे.

## रक्कम ट्रेझरीत, चौकशी प्रगतिपथावर

धुळे शहरातील गुलमोहर शासकीय विश्राम गृहातील खोलीत काल आढळून आलेली १ कोटी ८४ लाखांची रोकड ट्रेझरीमध्ये सुरक्षित ठेवण्यात आली आहे. या रोकड संबंधीतबाबी तपासण्यासाठी एडिशनल डायरेक्टर इनकम टॅक्स (तपास), नाशिक यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे. तसेच बीएनएस कायदा कलम १७३ (३) प्रमाणे चौकशी सुरू सुरू करण्यात आली असून प्रकरणाच्या चौकशीचे काम प्रगतीपथावर आहे. चौकशीत काय स्पष्ट होते, त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल, अशी माहिती पोलिस अधिक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिली.

## खोतकरांचा पलटवार- गोटेंची बदनामीची सवय

दरम्मान, आमदार अर्जुन खोतकर मांनी गोटेंचे सर्व आरोप फेटाळले. गोटेंना असे खोटे आरोप करण्याची सवम आहे. हे प्रकरण पूर्णपणे प्लान्टेड वाटतं. समिती किंवा सरकारचा माच्माशी कहीही संबंध नाही, असे खोतकर म्हणाले.दरम्मान मा प्रकरणामुळे राज्मात मोठी खळबळ उडाली आहे. आता चौकशी होते का आणि त्मातून कोणते निष्कर्ष मेतात, माकडे सवौचे लक्ष लागले आहे.

## मनपाची पिशवी, गायब झालेले लाखो रुपये

गोटेंनी म्हटले की, मनपा आयुक्तांनी ऐंशी लाख रुपयांची एक पिशवी समितीला दिली होती. परंतु नंतर त्या पिशवीत केवळ ५८ लाखच सापडले. या पिशवीवर एम लिहिलेलं होतं, म्हणजेच ती मनपाची असल्याचा स्पष्ट संकेत आहे.

## अनिल गोटेंचा खोतकरांना थेट सवाल

माझ्या आरोपात तथ्य नसेल तर मला अटक करा गोटे म्हणाले, खोतकर यांचा पीए १५ मेपासून विश्रामगृहात होता. त्या रोकडचा नेमका मालक कोण? सरकार तुमचं आहे, मी खोटं बोलत असेल तर मला अटक करा, अशी तयारी आहे.

# वैष्णवीच्या कुटुंबीयांचे सांत्वन; न्यायाचे आश्वासन

**पुणे । प्रतिनिधी**

लोक प्रेमापोटी बोलावतात म्हणून लग्नाला जावे लागते. नाही गेलो तरी माणसे रुसतात. शक्य असेल तेवढे आम्ही करतोच ना. पण म्हणून काय आम्ही त्यांना सांगतो का की तुम्ही सुनेसोबत असे वागा म्हणून? अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणावरून होणाऱ्या आरोपांना उत्तर दिले आहे. दरम्यान, आज मी जाहीर करून टाकतो, तो तर माझा पदाधिकारी नाही परंतु सभासद होता. त्याला आजपासून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातून मी हकालपट्टी केलेली आहे. अशी नालायक माणसं माझ्या पक्षात नको,असे ते म्हणाले. दरम्यान. अजित पवार यांनीही दूरध्वनीवरून संपर्क साधून कस्पटे कुटुंबियांचे सांत्वन करून न्यायाचे आश्वासन दिले.

मुळशी तालुक्यातील २४ वर्षीय वैष्णवी राजेंद्र हगवणे हिच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण जिल्हात खळबळ उडाली आहे. पुणे जिल्हातील मुळशी तालुक्यातील भुकूम येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) नेते राजेंद्र हगवणे यांची ती सून होती. वैष्णवी हगवणे हिचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. सुरुवातीला ही आत्महत्या असल्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, आता शवविच्छेदन अहवालातून धक्कादायक खुलासा झाला असून, वैष्णवीचा गळा दाबून खून केल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी हुंड्यासाठी छळ आणि सासरच्यांकडून होणाऱ्या जाचाला कंटाळून तिचा मृत्यू झाल्याचे समोर येत असून, सासरच्या पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, वैष्णवी हगवणे हिच्या संशयास्पद घटनेची माहिती मिळताच तात्काळ पिंपरी-चिंचवड आयुक्तांशी संपर्क साधून कठोर कारवाईचे निर्देश दिल्याचे त्यांनी सांगितले. कुणीही असो, त्याच्यावर कारवाई करा असे मी त्यांना सांगितले. पळून पळून कुठे जाणार? मी आजही सांगितले आहे की त्यांनी तीन टीम सोडल्या आहेत, तीन नाही तर सहा टीम सोडा, मुसक्या बांधूनच त्याला आणा असे मी सांगितले आहे, असे पवार म्हणाले.

## बाळ सुखरूप

पुण्यातील मुळशी तालुक्यातील हुंडाबळी ठरलेल्या २४ वर्षीय वैष्णवी हगवणे हिचे लहान बाळ अखेर तिच्या माहेरच्या कुटुंबीयांच्या (कसपटे कुटुंब) ताब्यात सुखरूप देण्यात आले आहे. गेल्या कही दिवसांपासून बाळ कोणाकडे आहे याबाबत चिंता व्यक्त केली जात होती.

## तक्रारीची दखल न घेणे गंभीर : तटकरे

हलगर्जीपणा केला असल्यास त्याबाबत चौकशी करण्यात येईल.मंत्री आदिती तटकरे यांनी गुरुवारी दुपारी वाकड येथे वैष्णवी हगवणे हिच्या आईवडिलांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. त्यानंतर आदिती तटकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. मंत्री तटकरे म्हणाल्या, कस्पटे कुटुंबाला न्याय देणे आवश्यक आहे. त्यांनी तक्रार केली असली तरी आणखी काही मुद्दे ते तक्रारीत नमूद करू शकतात. जेणेकरून ही केस स्ट्रॉंग झाली पाहिजे. संशयितांना कडक शिक्षा होण्यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता शासनाकडून केली जाणार आहे. हगवणे यांच्या मोठ्या सुनेने केलेल्या तक्रारीची दखल न घेणे ही गंभीर बाब आहे. महिला आयोगामधील कोणी किंवा पोलिसांनी यात हलगर्जीपणा केला असल्यास त्याबाबत चौकशी करण्यात येईल.

## आत्महत्या नव्हे खूनच : सुळे

आठ महिन्यांच्या तान्ह्या बाळाला सोडून कोणतीही आई आत्महत्या करणार नाही. वैष्णवीच्या शरीरावर मारहाणीच्या गंभीर खुणा आढळल्या आहेत, ज्यामुळे ही आत्महत्या नाही तर हा खूनच आहे, असा आरोप खासदार सुप्रिया सुळे यांनी २४ वर्षीय वैष्णवी हगवणे हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी केला आहे. या कुटुंबातील मुख्य पुरुष सदस्य अद्याप फरार कसा काय? पुरोगामी महाराष्ट्रात एका २४ वर्षीय मुलीला न्याय मिळालाच पाहिजे,अशी मागणी खासदार सुळे यांनी केली आहे.

## पैशांच्या हव्यासापोटी आपल्या मुलीचा बळी

### वैष्णवीच्या आई-वडिलांचा आक्रोश

लग्नानंतर अवघ्या दोन वर्षांत, कसपटे कुटुंबाची कन्या वैष्णवी हगवणे हिचा संशयास्पद मृत्यूची दुर्दैवी घटना घडली आहे. वैष्णवीचे वडील आणि आई आपल्या लेकीला गमावल्याच्या असह्य वेदनेत आहेत. अश्रू अनावर झालेल्या स्थितीत त्यांनी वैष्णवीने सासरच्यांकडून सहन केलेला अमानुष छळ आणि हुंड्यासाठीच्या सततच्या मागण्यांसंदर्भात धक्कादायक माहिती दिली आहे. केवळ पैशांच्या हव्यासापोटी आपल्या मुलीचा बळी घेतल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

लग्नानंतर काही महिन्यांतच छळाला सुरुवात वैष्णवीचा विवाह दोन वर्षांपूर्वी झाला होता. लग्नानंतर अवघ्या पाच ते सात महिन्यांतच तिच्या सासरच्यांकडून छळ सुरू झाला, असे तिच्या वडिलांनी सांगितले. सुरुवातीला, पालकांना त्रास होऊ नये म्हणून वैष्णवीने काहीही सांगितले नाही, कारण तिने स्वतःच्या मर्जीने लग्न केले होते. मात्र, जेव्हा तिच्या सासरच्यांनी चांदीच्या गौरायांची मागणी केली आणि मातीच्या गौराया देण्याऐवजी चांदीच्या गौराया मागत असल्याचे तिने रडत रडत सांगितले, तेव्हा पालकांना पहिल्यांदाच तिच्यावरील त्रासाची कल्पना आली.

सासरचे लोक सतत पैशांची आणि वस्तूंची मागणी करत होते. वैष्णवी घरी दीड-दोन महिन्यांनी आली की, काहीतरी मागायची आणि तिचे वडील तिला पाहिजे तसे पन्नास हजार ते एक लाख रुपये देत असत. लग्नावेळी ५१ तोळे सोने, फॉर्च्युनर गाडी, चांदीची पाच पाच ताटे (प्रत्येकी ५-७ किलो), पाच सात किलोची चांदीची भांडी दिली होती. श्रावण मासाला अंगठी, चांदीचे ताट, अधिक मासासाठी अनेक वस्तू दिल्या होत्या. तरीही त्यांचा हव्यास वाढतच गेला असे त्यांनी सांगितले.

# एटीएम फोडून एकोणीस लाखांची चोरी

## अंबडच्या निरीक्षकांना घटनेची माहितीच नाही; गुन्हा दाखल

**नाशिक। प्रतिनिधी**

अंबड एमआयडीसीतील नाशिक इंजिनिअरिंग क्लस्टरसमोर बुधवारी मध्यरात्री चोरट्यांनी एका खासगी बँकेचे एटीएम मशीन फोडून १८ लाख, ७६ हजार रुपये लांबविले. एटीएमचा सुरक्षारक्षक सकाळी ड्युटीवर आला असता ही घटना उघड झाली. दरम्यान, अंबड पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या चुंचाळे पोलीस चौकीच्या हद्दीत ही गंभीर घटना घडली असताना अंबडच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना या प्रकाराची कानोकान खबर नसल्याचे समोर आले आहे.

मयूर संजय महाजन(रा. वृंदावन पार्क, पाथर्डी फाटा, नाशिक) यांच्या फिर्यादीनुसार, बुधवारी(दि. २२) रोजी मध्यरात्री एक्स्लो पॉईंटजवळील आयसीआयसीआय बँकेच्या एटीएममध्ये संशयितांनी शिरून तीन एटीएम मशिनपैकी एक मशिन गॅस कटरने कापून १८ लाख ७६ हजार रुपये चोरून नेले. याबाबत गुन्हा दाखल झाला असून अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दरम्यान, यापूर्वी शहरात घडलेल्या अनेक एटीएम मशिन चोरी व त्यातील पैसे चोरीचा छडा लागला नसून अनेक बँकेंनी नाराजी व्यक्त केल्याचे समजते. तपास उपनिरीक्षक शेवाळे हे करत आहेत.

## रवींद्र पाटील यांची निवड

**नाशिक ।** नाशिक जिल्हातील आर.के.प्लॅनर्स ग्रुपचे संचालक उद्योजक रवींद्र पाटील यांची नुकतीच श्री संत सद्गुरु नारायणगिरी पतसंस्थेच्या चेअरमनपदी नियुक्ती करण्यात आली.

चेअरमन पदाच्या निवडणुकीसाठी तीन जणांनी अर्ज दाखल केले होते.त्यात रवींद्र पाटील, संजय साठे व चांगदेव सोमासे यांचे अर्ज होते. चांगदेव सोमासे यांनी रवी पाटील यांना पाठींबा दिला. अंकरा मतदारांपैकी रवी पाटील यांना ६ मते मिळालयाने ते विजयी झाल्याने निवडणूक अधिकारी कैलास आढाव यांनी जाहीर केले.

## आजचे कार्यक्रम

❋ स्व. कांताबेन रसिकलाल शाह स्मृती व्याख्यान
वक्ते :- अझहर तंबुवाला, आंतरराष्ट्रीय व्यवसाय प्रमुख, सह्याद्री फार्म्स, मोहाडी
विषय : भारतीय फलोत्पादन आणि बाहेरील जग : एक दृष्टिकोन

# अस्वच्छता, अनारोग्य, अज्ञान दूर करूया : मोरे

**नाशिक ।** राष्ट्रसंत तुकडोजी, संत गाडगेबाबां, सद्गुरू मोरेदादा, गुरुमाऊली यांनी आपले आयुष्य समाजाला अंधश्रद्धेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी खर्ची घातले. स्वच्छता आणि आरोग्याचा मंत्र निरक्षर, अडाणी, अज्ञानी जनतेला देण्यासाठी आयुष्यभर या महात्म्यांनी अखंडित पायपीट करून जनजागृती केली. अत्यंत साध्यासोप्या, सामान्य माणसाला समजेल अश्या भाषेत जनप्रबोधन केले. आज खऱ्या अर्थाने हा वारसा पुढे घेऊन जाऊया, असे आवाहन चंद्रकांत दादा मोरे यांनी केले.

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ सेवामार्गाच्या वतीने गोदाकाठ आणि त्र्यंबकेश्वरी राबविण्यात येत असलेल्या स्वच्छता अभियानास तीन वर्षे पूर्ण झाली. यानिमित्त गोदाकाठावरील समर्थ केंद्रात उपस्थित महिला, पुरुष सेवेकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी वरील आवाहन केले.

पान १ वरुन..

# मी नाशिकचा बालक : भुजबळ

आपल्या भावना व्यक्त केल्या.

भुजबळ पुढे म्हणाले की, आपला जन्म मुळात नाशिकचा आहे. लोकप्रतिनिधी म्हणून नाशिकच्या विकासासाठी आपण अनेक महत्वपूर्ण कामे केलेली आहे. मी नाशिकचा बालक आहे त्यामुळे पालक होईल की नाही याची मला चिंता नाही. आगामी काळात पालकमंत्री असेल किंवा कुठले पदे असतील आपल्याला जे पद मिळेल त्यामाध्यमातून आगामी कुंभमेळ्यासह नाशिकच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपण सदैव तत्पर राहू ही सर्व कामे मार्गी लावली जातील असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी माजी खासदार देविदास पिंगळे, माजी आमदार जयवंत जाधव, प्रदेश सरचिटणीस दिलीप खैरे, शहराध्यक्ष रंजन ठाकरे, जिल्हाध्यक्ष अँड.रवींद्र पगार, जिल्हाध्यक्ष विष्णुपंत म्हैसधुने, नाना महाले, गोरख बोडके, बाळासाहेब कर्डक, महिला जिल्हाध्यक्ष प्रेरणा बलकवडे,महिला शहराध्यक्ष योगिता आहेर, कविता कर्डक, युवक शहराध्यक्ष अंबादास खैरे, समाधान जेजुरकर, संजय खैरनार, डॉ.योगेश गोसावी, प्रा. ज्ञानेश्वर दराडे, पूजा आहेर, आशा भंदुरे, सचिन जाधव, गौरव गोवर्धने, चेतन कासव, निवृत्ती अरिंगळे, अजय खांडबहाळे, प्रसाद सोनवणे, सलीम शेख, नितीन चंद्रमोरे, डॉ. सागर कारंडे, प्रमोद सोनवणे, मनीष रावळ, मूख्तार शेख,यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी व अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, भुजबळ यांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर नाशिक शहर व जिल्हातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये चैतन्य संचारले आहे. भुजबळ यांच्या स्वागतासाठी राष्ट्रवादी भवन कार्यालयात विद्युत रोषणाई व फुलांची सजावट करण्यात आली. त्यांच्या स्वागतासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली. नाशिक अगोदर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे दोन मंत्री असताना मंत्री छगन भुजबळ यांच्या रूपाने तिसरे मंत्रीपद मिळाल्याने पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या कार्यालयाबाहेर सकाळपासून ढोल,ताशांचा गजर घुमत होता. ना. भुजबळ यांचे आगमन होताच फटाक्यांची आतषबाजी व फुलांची उधळण करत त्यांचे स्वागत करण्यात आले. के नच्या सहाय्याने भलामोठा हार त्यांना प्रदान करण्यात आला.

# 'जिंदाल'ची आग धुमसतीच; तीन किमी परिसरातील गावे निर्मनुष्य

जात आहे. आग विझवण्यासाठी नाशिक, ठाणे, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर या जिल्ह्यातून अग्निशमन दलाच्या २० गाड्या कार्यरत होत्या. तसेच आपत्ती व्यवस्थापन टिम घटनास्थळी दाखल झाली असून फोम आणि पाण्याच्या साहाय्याने आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. तर आकाशात आगीच्या धुराचे लोट मोठ्या प्रमाणात पसरले असून आगीची तीव्रता वाढतच आहे. जिंदाल पॉलीफिल्म कंपनीच्या लागलेल्या आगीला ४० तास उलटून गेले तरी आग आटोक्यात आलेली नाही.कंपनीच्या आतमध्ये असलेल्या गॅस टाकीचा स्फोट झाल्यास पंधरा किलोमीटर पर्यंतचा परिसर बाधित होण्याची शक्यता वर्तवल्याने परिसरातील गावे, कंपन्या, शाळा आणि परिसर निर्मनुष्य करण्याच्या प्रशासनाने सूचना देण्यात आल्या आहेत. अजूनही ही आग दोन ते तीन दिवस अशीच राहणार असल्याचे सांगण्यात येत असून प्रशासन आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी काय उपाययोजना करते हे पहाणे महत्वाचे ठरणार आहे. या भीषण घटनेने या कंपनीचा काम करणारे तीन ते साडेतीन हजार परप्रांतीय कामगारांना कंपनीने कालच बाहेर काढल्याने या कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली आहे. मिळेल त्या वाहनाने हे कामगार आपल्या मुळ गावी परतताना दिसत असून इगतपुरी रेल्वे स्थानकावर आता या कामगारांची गर्दी दिसत होती. दोन दिवसांपासून या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## धरणातील पाणी काळवंडले

कंपनीतील सर्व धुराचे लोट पालघर साईटला जात असल्याने बुधवारी रात्री पालघर जिल्ह्यात काळ्या रंगाचा पाऊस पडल्याची माहिती मिळत आहे. तर मुक्तपे धरणातील पाणीही काळे पडल्याचे पाडळी येथील नागरिक सांगत आहेत.

## आगीची तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न

कंपनी पॉलिफिल्म बनवते त्यासाठी लागणार कच्चा माल अत्यंत ज्वलनशील असून त्याची आग लिक्विड होऊन पसरते. पाण्याने आग विझत नाही त्यासाठी फोम लागतो. पुणे, ठाणे, संभाजीनगर, अहिल्यानगर जिल्ह्यातून अग्निशमन दलाच्या टीम आल्या. जिल्हा प्रशासन म्हणून आम्ही आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. या ठिकाणी प्रोपेन टँक आहे त्यात लिक्विड गॅस असून तो टँक फिक्स असल्याने हलविता येत नाही. हा टँक आगीपासून तो ५० ते ६० मीटर दूर आहे. टँकच्या बाजूला धरणातील गाळ टाकून थंडावा निर्माण केला जात असुन लोकांचा जीव वाचविणे ही आमची प्राथमिकता आहे. जरी टँकला आग लागली तरी सेफटी वॉल आहेत त्यामुळे टँक फूटण्याची शक्यता कमी आहे. जरी तसे झाले तरीही त्याची तीव्रता कमी करण्याचे काम सुरु असुन स्फोट झाला तर त्याच्या धमाकामुळे घराच्या काचा फुटू शकतात. लोकांना इजा पोहचू शकते म्हणून लोकांना सुरक्षित ठिकाणी जाण्यास सांगितले आहे. आग विझविण्यासाठी कोणत्याच साधनांची कमतरता नसून इतर जिल्ह्यातून चांगले सहकार्य मिळत आहे.

- जलज शर्मा , जिल्हाधिकारी

## गर्दीच्या कार्यक्रमांना बंदी

खबरदारीचा उपाय म्हणून परिसरातील गावांमध्ये जमावबंदी लागू करण्यात आली आहे. सदर तीन किमी परिसरात शस्त्र, दगड, ज्वलनशील पदार्थ, काठी इत्यादी धोकादायक वस्तू घेऊन फिरण्यास मनाई करण्यात आली आहे. तीन किलोमीटर परिसरात उत्तेजक भाषणे, जाळणे, मिरवणुका काढणे यास मनाई केली आहे. परिसरात सार्वजनिक ठिकाणी कोणतेही सांस्कृतिक, धार्मिक किंवा राजकीय कार्यक्रम आयोजित करण्यास बंदी घालण्यात आली आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मुंबई पोलीस अधिनियम व भारतीय दंड संहिता अंतर्गत कारवाई करण्यात येईल तसेच हा आदेश दिनांक २१ मे २०२५ पासून वरील आपत्ती निवारणापर्यंत लागू राहील असे पत्र काढल्याची माहिती सहायक जिल्हाधिकारी ओमकार पवार यांनी दिली आहे.

जिंदल परिसरात तालुका वैद्यकीय विभागाच्या वतीने चार ॲम्ब्युलन्स घटनास्थळी दाखल केल्या असून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. जिंदाल कंपनीच्या धुरामुळे श्वासाचे , डोळ्यांचे आजार वाढू शकतात.केमिकलच्या आगीचा धूर जमिनीवर पसरतो आहे, त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी.

डॉ. देशमुख, तालुका वैद्यकीय अधिकारी

जिंदाल कंपनीत अडीच वर्षापूर्वी देखील आग लागली होती. मात्र त्यावेळी गावांना धोका नव्हता. यावेळेस प्रशासनाने गावे खाली करायला सांगितली असून प्रत्येक जण आपापल्या परीने गाव सोडून नातेवाईक असलेल्या गावात जात आहेत.

- विश्वंभर गतीर , ग्रामस्थ ,मुंढेगाव

## बाळासाहेब पाटील नाशिकचे पोलीस अधीक्षक



लक्ष लागून होते. तर गेल्या काही दिवसांपासून पालघर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांचे नाव चर्चेत होते. त्यानुसार, गुरुवारी (दि. २२) राज्यातील २१ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या गृहविभागाने जाहीर केल्या. त्यात पालघरचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांची नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली. बाळासाहेब पाटील हे २००१ च्या तुकडीचे पोलीस उपअधीक्षक असून सांगली येथून त्यांच्या पोलीस सेवेला प्रारंभ झाला. अकोला येथे उपअधीक्षकानंतर सांगली येथे पुन्हा अपर अधीक्षक म्हणून काम पाहिले. यानंतर उपायुक्त, महामार्ग अधीक्षक, ठाणे आयुक्तालयात काम करीत असताना २०२० मध्ये त्यांना आयपीएस पदी बढती मिळाली. सध्या पालघर येथे पोलीस अधीक्षक असलेले बाळासाहेब पाटील हे शुक्रवारी (ता.२३) नाशिक ग्रामीण पोलीस दलाच्या अधीक्षक पदाचा पदभार स्विकारु शकतात.

## टाकळीची वाडीचा पाण्यासाठी संघर्ष थांबणार

गेल्या काही दिवसांपूर्वी या वाडीला अनेकदा भेटी दिल्या होत्या. येथील महिलांचा पाण्यासाठी असलेला संघर्ष बघितला होता ते बघून त्यांचे डोळे अक्षरशः पाणावले होते. अथक प्रयत्नातून टाकळीचीवाडी सोबतच अजून एक बोरीचीवाडी या गावांचा पाणी प्रश्न सोडवण्यासाठी एक पर्याय शोधल्याने महिलांची पिण्याच्या पाण्यासाठी आता पायपीट थांबणार आहे. गेल्या दहा वर्षात एसएनएफने ३३ गावांना पाण्यासाठी स्वयंपूर्ण मदत केली आहे. आता यात अजून दोन गावे सामील झाल्याचा आनंद व्यक्त करण्यात आला. संस्थेचे पदाधिकारी योगेश क्षीरसागर आणि मी संभाजीनगरच्या एसपीआयचे क्लासमेट. त्याला टाकळ्याच्या वाडीतील भिषण पाणी टंचाईची माहिती मिळाली आणि त्यांनी संस्थेच्या माध्यमातून त्वरीत लागेल ती आर्थिक मदत देण्याचे कळवले. त्यानंतर योगेश, त्याचे वडील रमेश सोमनाथ क्षीरसागर, एसएनएफ पाणी योजना प्रमुख प्रशांत बच्छाव, भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. जयदिप निकम यांच्यासह नुकतीच एसएनएफ टिमने दोन्ही गावांना भेट दिली आणि योजनेच्या दिर्घकालीन शाश्वततेविषयी खात्री करून घेतली. विशेष आनंदाची गोष्ट म्हणजे येथील गावकरीही पूर्ण उत्साहाने श्रमदानासाठी तयार आहेत.